


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : ३२६ वा | मंगळवार दि २४ मार्च २०२६ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# बुलढाणा जात पडताळणी घोटाळा विधिमंडळात स्फोट, अधिकाऱ्याचा उद्धट पलटवार!

## जात पडताळणी घोटाळा मनोज मेरत यांच्यावर माजी कॅबिनेट मंत्री आ.अनिल परब यांची कारवाईची मागणी

**जनसंचलन/बुलढाणा**

जात पडताळणीच्या गंभीर प्रकरणावरून राज्याच्या राजकारणात अक्षरशः ठिणगी पडली असून,आमदार अनिल परब आणि बुलडाणा येथील संशोधन प्रभारी अधिकारी मनोज मेरत यांच्यातील संघर्ष आता उघडपणे धुमसताना दिसत आहे. विधिमंडळात परब यांनी मेरत यांच्यावर केलेले भ्रष्टाचाराचे आरोप धक्कादायक असून, बंजारा समाजाच्या नावाखाली बोगस जात प्रमाणपत्रांना व्हॅलिडिटी देण्याचा थेट आरोप करत त्यांनी या प्रकरणाला भ्रष्टाचाराचे रॅकेट म्हटले आहे.माजी केबिनेट मंत्री दर्जेचे असलेले ऍडव्हॉकेट डॉ.अनिल परब यांनी बुलडाणा येथे प्रभारी कार्यरत असलेले मनोज मेरत




यांना या कथित रॅकेटचा मोरक्या ठरवत, गेल्या दहा वर्षांपासून बुलढाण्यातच ठाण मांडून भ्रष्ट व्यवहार सुरू असल्याचा घणाघात केला. एवढ्यावरच न थांबता त्यांनी सरकारकडून कडक कारवाईची मागणी करत प्रशासनालाच जाब विचारला. मात्र,या सर्व आरोपांवर शासकीय सेवेत कार्यरत अधिकारी मनोज मेरत यांनी दिलेले प्रत्युत्तरही तितकेच आक्रमक आणि धक्कादायक ठरले आहे. आमदारांची माहितीच चुकीची आहे, असा थेट पलटवार करत मेरत यांनी स्वतःवरचे सर्व आरोप फ ेटाळले.२०२४ मध्येच अकोल्यात बदली झाल्याचे सांगत, सध्या बुलढाण्याचा कार्यभार केवळ प्रभारी स्वरूपात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.यामुळे हा वाद आता केवळ आरोप-प्रत्यारोपांपुरता मर्यादित न राहता ङ्गराजकीय नेता विरुद्ध शासकीय अधिकारीफ असा थेट संघर्ष बनला आहे. एका बाजूला माजी केबिनेट मंत्री तथा आमदारांचा भ्रष्टाचाराचा स्फोटक आरोप, तर दुसऱ्या बाजूला अधिकाऱ्याची उघडपणे दिलेली चुकीची माहितीची शिक्कामोर्तब प्रतिक्रियाया सगळ्यामुळे प्रशासनाच्या विश्वासार्हतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

---

# मेहकरमध्ये ब्रेकिंग आमदाराला खेचून मारण्याची भाषा, पोलिस शांत?

**जनसंचलन/मेहकर**

शहरात राजकीय वातावरण सध्या अक्षरशः पेटले असून एका शिवसैनिकाच्या भडक आणि वादग्रस्त वक्तव्याने खळबळ उडाली आहे. शिंदे गटाच्या एका कार्यकर्त्याने पत्रकार परिषदेत थेट ठाकरे गटाचे आमदार सिद्धार्थ खरात यांना उद्देशून कोणीही असू द्या, आमदारालाही बाहेर काढून झपकवू, अशी उघड धमकी दिल्याने संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली आहे. सदर पत्रकार परिषदेत बोलताना संदीप तठ्ठे यांनी माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या कामाचे श्रेय इतरांनी घेऊ नये, अन्यथा गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा इशारा दिला. यावेळी त्यांनी आमच्यावर आधीच २५-२५ गुन्हे दाखल आहेत, त्यामुळे आम्ही कोणालाही घाबरत नाही, असे उघडपणे सांगितले. या वक्तव्यामुळे कायद्याचा धाक संपला आहे का, असा गंभीर सवाल नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. दरम्यान, दोन शिवसैनिकांमधील हा वाद आता उघड संघर्षात बदलण्याची चिन्हे दिसत असून मेहकरमधील राजकीय समीकरणे ढवळून निघण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत असून प्रशासनाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. महत्त्वाचा मुद्दा म्हणजे इतक्या गंभीर धमकीनंतरही अद्याप संबंधित व्यक्तीवर गुन्हा दाखल का करण्यात आलेला नाही? कायद्याचे खुलेआम आव्हान देणाऱ्या या वक्तव्यावर पोलीस प्रशासन, विशेषतः एसपी तांबे साहेब कोणती ठोस कारवाई करणार, याची उत्सुकता वाढली आहे. मेहकरमध्ये कायदा व सुव्यवस्था



राखण्यासाठी तातडीने कठोर पावले उचलली जातील का, की हे प्रकरणही राजकीय दबावाखाली दडपले जाईल, हे पाहणे आता अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.

# आपले ऊर्जा संकट आणि विन्स्टन चर्चिल



ते पहिल्या महायुद्धापूर्वीचे दिवस होते. ब्रिटिश साम्राज्यावरील सूर्य कधीही मावळत नसे. या ब्रिटिश वर्चस्वापुढे जर्मनीचे आव्हान उभे राहत होते. अशा काळात विन्स्टन चर्चिल नाविक मंत्री झाले. त्यांच्या लक्षात आले की भविष्यात जर्मनी आणि ब्रिटन यांच्यात संघर्ष होणार आणि त्यासाठी आपण ब्रिटिश नाविक सामर्थ्य वाढवायला हवे. नौदलाच्या आधारेच ब्रिटनचे जागतिक वर्चस्व टिकून होते. त्यासाठी ब्रिटनच्या युद्धनौका तेलावर चालतील असा निर्णय चर्चिल यांनी घेतला. त्याआधी ब्रिटिश युद्धनौका कोळशावर चालत असत. ब्रिटनमध्ये कोळसा मुबलक प्रमाणात सापडतो. त्यामुळे ब्रिटन कोळशाबाबत स्वयंपूर्ण होता. नाविक दलासाठी लागणारे तेल ब्रिटनमध्ये सापडत नसे. त्यामुळे तेल आयात करावे लागणार होते तेलासाठी ब्रिटनला इतर देशांवर अवलंबून राहावे लागणार हेही स्पष्ट होते. असे अवलंबित्व राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने धोकादायक असते. या परिस्थितीत ब्रिटनचे धोरण काय असायला हवे, असा प्रश्न समोर आल्यावर चर्चिल यांनी दिलेले उत्तर होते: .
कोणत्याही एका देशावर तेलासाठी अवलंबून राहणे हे धोकादायक असून आपल्याला आवश्यक असलेले तेल अनेक देशांकडून आयात करायला हवे, असा याचा अर्थ. आज अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्याच्या निमित्ताने आपल्यासमोर अतिशय गंभीर ऊर्जासंकट उभे आहे. स्वयंपाकासाठी लागणाऱ्या गॅसची टंचाई पाहता, १९७०च्या दिवसांची पुन्हा आठवण यायला सुरुवात झाली आहे. पश्चिम आशियातून दोन जहाजे आपल्या किनारपट्टीवर आली तर एखाद्या कोलंबसाला अमेरिका सापडावी अशा रीतीने आनंद व्यक्त केला गेला इतकी अवस्था गंभीर आहे. अशा परिस्थितीत, आपल्या देशाच्या ऊर्जासुरक्षेचा विचार करताना हेही लक्षात येईल की, भारतात अनेकांना न आवडणारे विन्स्टन चर्चिल पुन्हा खरे ठरले आहेत! आज आपली अवस्था इतकी बिकट का झालेली आहे? या प्रश्नाचे उत्तर शोधताना आपल्या देशाच्या ऊर्जेची गरज कशी भागवली जाते, हे पाहायला हवे. तेल, गॅस आणि कोळसा हे आपल्याकडे ऊर्जेचे मुख्य स्रोत आहेत. याच बरोबरीने आता सौरऊर्जा आणि पवनऊर्जा यांचे प्रमाण हळूहळू वाढत आहे. ऊर्जा वापरात जागतिक स्तरावर भारत हा चीन आणि अमेरिका यांच्यानंतर तिसऱ्या क्रमांकाचा देश आहे. भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश आहे. तसेच देशाची वाढती अर्थव्यवस्था आणि मध्यमवर्गाचे वाढणारे प्रमाण यामुळे आपला ऊर्जेचा वापर इथून पुढच्या काळात वाढतच जाणार आहे. असा अंदाज व्यक्त केला जातो की, २०५० पर्यंत देशात पन्नास कोटी वाहने असतील. आपल्याकडे केवळ मागच्या वर्षी दीड कोटी एसी विकले गेले. ही संख्या पुढे आणखी वेगाने वाढतच जाणार आहे. त्यामुळे भारताची ऊर्जेची गरज कशी भागवायची यावर विचारमंथन सुरू झाले आहे. ऊर्जा सुरक्षा हा प्रश्न विषमभुज त्रिकोणासारखा आहे. या त्रिकोणाची एक बाजू ही जास्तीत जास्त लोकांना अधिकाधिक ऊर्जेचा पुरवठा परवडणाऱ्या किमतीत कसा करता येईल ही आहे. तर दुसरी बाजू ही ऊर्जा पुरवठा आणि आर्थिक विकास करतानाच पर्यावरण रक्षण कसे होईल, ही आहे. आणि याच्या जोडीला ऊर्जेचे आंतरराष्ट्रीय राजकारण ही तिसरी बाजू आहे. इराण युद्धाच्या निमित्ताने विषमभुज त्रिकोणाची ही तिसरी बाजू आता सर्वांत मोठी झालेली आहे. भारताची तेलाची रोजची गरज ही पंचेचाळीस लाख बॅरल्स इतकी आहे. (एक बॅरल म्हणजे साधारणतः १५९ लिटर). यापैकी सुमारे पंच्याऐंशी टक्के तेल आयात केले जाते. तेलाचे देशांतर्गत उत्पादन गरजेच्या तुलनेत फारच कमी आहे. त्यामुळे तेल आयात करण्यावाचून भारताला पर्याय नाही. भारत कोणाकडून तेलाची आयात करतो? पश्चिम आशियातून सुमारे पंचेचाळीस टक्के तेल येते. एकेकाळी इराण हा आपला मोठा पुरवठादार होता. मात्र अमेरिकेच्या दबावाखाली भारताने इराणकडून तेल खरेदी बंद केली. रशिया सुमारे चाळीस टक्के तेलाचा पुरवठा करतो. उर्वरित पंधरा टक्के तेल हे अमेरिका, गयाना, नायजेरिया अशा देशांकडून येते. रशियाकडून तेलाची आयात ही २०२२ पासून फार मोठ्या प्रमाणावर सुरू झाली. हे तेल आपण खरेदी करू नये, यासाठी अमेरिकेने आपल्यावर दबाव टाकला होता. गॅसबाबत सुद्धा आयात करावीच लागते. भारत जगातील सर्वांत मोठ्या गॅस आयातदारांपैकी एक आहे. आपल्या आयातीपैकी दोन तृतीयांश गॅस हा पश्चिम आशियातून येतो. कतार हा देश आपल्यासाठी या दृष्टीने महत्वाचा आहे. त्यामुळे तेल आणि गॅस या दोन्हीच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय राजकारण महत्त्वाचे ठरते. या तेल आणि गॅसच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत एक मोठा फरक आहे. तेलाची बाजारपेठ ही जागतिक स्वरूपाची आहे. तेलाची वाहतूक ही प्रामुख्याने जहाजांमधून होते. गॅसबाबत असे नाही. गॅसची बाजारपेठ ही प्रादेशिक असते. गॅसचा पुरवठा हा मुख्यतः पाइपलाइन्स मधून होतो. (रशियाकडून युरोपला जाणाऱ्या गॅस पाइपलाइन्स युक्रेनमधून जातात.) गॅसची जहाजांमधून केली जाणारी निर्यात ही द्रवरूपात होते. त्यामुळे असा गॅस किनारपट्टीवर उत्तरावल्यानंतर या द्रवरूपाला पुन्हा वायुरूपात आणणे यासाठी खास ङ्गरी गॅसिफिकेशनफप्रकल्प लागतात. असे प्रकल्प नसतील तर गॅस भरलेली जहाजे येऊनही फार काही उपयोग होत नाही. त्यामुळेच गॅसचा पुरवठा हा दीर्घ मुदतीच्या करारांच्या माध्यमातून केला जातो. हे सांगण्याचा हेतू हा की, तेलाच्या बाजारपेठेत बऱ्यापैकी लवचीकता असते; तर गॅसच्या बाबत अशी लवचीकता खूप कमी असते. इथेच विन्स्टन चर्चिल यांचे विधान पुन्हा महत्त्वाचे ठरते. या संकटाच्या निमित्ताने देशांतर्गत स्तरावर विजेवरील वाहनांचे महत्त्व पुन्हा एकदा नव्याने अधोरेखित झाले आहे. अनेकांनी स्वयंपाकासाठी इलेक्ट्रिक शेगड्या वापरायला सुरुवात केली आहे. त्या निमित्ताने वीजनिर्मिती क्षेत्राकडे पाहिल्यास काय चित्र दिसते? वीजनिर्मितीमध्ये नवीकरणीय (रीन्यूएबल) ऊर्जा क्षेत्राचे योगदान हे बावीस टक्के आहे. देशातील पंच्याहत्तर टक्के वीजनिर्मिती ही कोळशाच्या माध्यमातून केली जाते. आपण दक्षिण आफ्रिका, इंडोनेशिया आणि ऑस्ट्रेलिया यांच्याकडून कोळशाची आयात करतो. वातावरण बदलाच्या दृष्टीने पाहिल्यास कोळशाला ङ्गव्हिलनफमानले जाते. मात्र जर भारताने देशांतर्गत स्तरावर विजेवरील वाहने आणि शेगड्या यांचा मोठ्या प्रमाणात वापर सुरू केला तर त्यासाठी अधिकाधिक प्रमाणात वीजनिर्मिती करावी लागेल. त्यासाठी कोळशाला बाजूला टाकून चालणार नाही. त्यामुळे पर्यावरणपूरक विजेवरील वाहने चालवण्यासाठी कोळसा-निर्मित वीज वापरणे असा एक विरोधाभासी प्रकार आपल्याला पाहायला मिळतो. तसेच विजेवरील वाहनांच्या निर्मितीमध्ये चीनने मुसंडी मारलेली आहे. या वाहनांसाठी लिथियमच्या बॅटऱ्या लागतात. जगातील पंच्याहत्तर टक्के बॅटऱ्या चीनमध्ये तयार होतात. त्यामुळे विजेवरील वाहनांच्या दिशेने आपण गेलो आणि भविष्यात आपल्याला चीनने वेठीस धरले तर? त्यामुळे देशाच्या ऊर्जा सुरक्षेकडे पाहिल्यास काय दिसते? तेल आणि गॅस या क्षेत्रांमध्ये अमेरिका आघाडीवर आहे.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# शिवनेरीसह आता धावणार 'राजमाता जिजाऊ' बस, एसटीच्या ताफ्यात ३ हजार नव्या बस

**मुंबई/वृत्तसंस्था :** शिवशाही आणि शिवनेरी बससेवेनंतर महाराष्ट्र राज्य रस्ते वाहतूक महामंडळाकडून राज्यभरात नवी बससेवा सुरू होणार आहे. या नव्या एसटी बसला राजमाता जिजाऊ असे नाव दिले असून यापूर्वीच्या एसटी बसपेक्षा अत्याधुनिक बस असणार आहे. या सेवेचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या हस्ते, मंगळवारी, 24 मार्च रोजी, होणार आहे. विधिमंडळ अधिवेशनाचा सध्या शेवटचा आठवडा सुरू असून मंगळवारी विधीमंडळाच्या प्रांगणात हे लोकार्पण होणार आहे. यावेळी मुख्यमंत्र्यांसह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पावर देखील उपस्थित असतील. या बससेवेची घोषणा फेब्रुवारीमध्येच महाराष्ट्राचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली होती. आता या लोकार्पण सोहळ्यानंतर या सेवेला हिरवा कंदील मिळणार आहे. तसेच,




एसटी महामंडळाच्या ताफ्यात लवकरच 3,000 राजमाता जिजाऊ या स्मार्ट बस दाखल होतील. दोन शहरांदरम्यान चालणाऱ्या या बस सर्वात आधी गर्दीच्या मार्गावर धावणार आहेत. घोषणेच्या वेळी या बस मुंबई, पुणे, नाशिक आणि नागपूर शहरांत सुरू होतील अशी माहिती मिळाली होती. आता ही सेवा सर्वात पहिली नागपूरमध्ये सुरू होणार असून पहिल्यांदा 50 बस शहरात दाखल होतील.सध्या मुंबई-पुणे आणि इतर मोठ्या शहरांदरम्यान शिवनेरी, शिवशाही, शिवाई सारख्या बस एसटी महामंडळाकडून चालवल्या जातात. या बसला नेहमी गर्दी असून तिकीटांच्या परवडणाऱ्या दरामुळे मोठी मागणी असते. अनेकदा प्रवाशांना उभं राहून संपूर्ण प्रवास करावा लागतो. पण आता राजमाता जिजाऊ बस सेवेमुळे बसच्या संख्येत वाढ होणार आहे. या बसेस आधीपेतक्षा आधुनिक असल्यामुळे प्रवासही वेगवान आणि अधिक सुरक्षित होणार आहे.आता सुरू असलेल्या बसची आसन क्षमता 40 आहे. पण या नव्या बसमध्ये 3 बाय 2ची आसन रचना असून 56 आसन क्षमता असणार आहे. यामुळे साधारण बसेसपेक्षा अधिक प्रवासी प्रवास करू शकतात. शिवाय या नव्या बसेस स्मार्ट बसेस असतील. यानंतर प्रवाशांचा प्रवास अधिक आरामदायी होईल असे आश्वासन देण्यात आले आहे. दोन प्रमुख शहरांदरम्यान शटल सेवेसारख्या या बसेस चालवल्या जातील. प्रवास अधिक सुखकर करण्याच्या हेतूने ही सेवा सुरू होणार आहे. लवकरच या बसेसेवाचा विस्तार नागपूरहून इतर शहरांतही करण्यात येणार आहे.मंगळवारी होणाऱ्या या लोकार्पण सोहळ्यात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांसह अनेक नेते उपस्थित असतील. यामध्ये विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे आणि अध्यक्ष राहुल नार्वेकर हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित असतील अशी माहिती मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.

दरम्यान, या बसमध्ये 4 CCTV कॅमेरे, जीपीएस यंत्रणा, सुरक्षेसाठी पॅनिक बटन, महत्त्वाची माहिती देण्यासाठी पब्लिक अनाउन्समेंट सिस्टीम आणि प्रवासाचा मार्ग दर्शवण्यासाठी इलेक्ट्रॉनिक मार्ग फलकसुद्धा असतील.

## भाजप–शिवसेना राड्यात SP निलंबित ; शिंदेंसमोर आक्रमक, भाजपवर आरोप

**मुंबई/वृत्तसंस्था :** सातारा जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडणुकीत झालेल्या नाट्यमय राजकीय घडामोडींनंतर सत्ताधारी भाजप आणि शिवसेनेतील संघर्षाने टोक गाठलं आहे. शिवसेनेचे मुख्य नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सभागृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोरच साताऱ्यातील घडामोडींबाबत



नाराजी व्यक्त केल्यानंतर आता शिवसेनेच्या इतर मंत्र्यांनीही आक्रमक भूमिका घेतली आहे. सभागृहातील कामकाजानंतर शिवसेनेच्या मंत्र्यांनी एकनाथ शिंदे यांची भेट घेत आपली खदखद व्यक्त केल्याची माहिती आहे. भाजपकडून वारंवार गळचेपी होत असल्याचा आरोप या मंत्र्यांनी शिंदे यांच्यासमोर केल्याचे समजते.नुकतीच झालेली सातारा जिल्हा परिषद अध्यक्षपदाची निवडणूक वादात सापडली आहे. या निवडणुकीवेळी भाजप आणि शिवसेना-राष्ट्रवादीच्या मंत्र्यांमध्ये जोरदार संघर्ष झाला. एकीकडे भाजपकडून मंत्री शिवेंद्रराजे भोसले, मंत्री जयकुमार गोरे तर दुसरीकडे शिवसेनेचे मंत्री शंभूराज देसाई आणि राष्ट्रवादीचे मंत्री मकरंद पाटील यांनी आपल्या विचारांचा उमेदवार निवडून आणण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली होती. मात्र ऐनवेळी दोन जिल्हा परिषद सदस्यांना पोलिसांनी मतदान करू न दिल्याने आणि काही मते फुटल्याने शिवसेना-राष्ट्रवादीच्या उमेदवाराला पराभवाचा धक्का सहन करावा लागला आणि भाजपचा विजय झाला. या निवडणुकीवेळी शिवसेनेचे नेते आणि साताऱ्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांना धक्काबुक्की झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर आता शिवसेना आक्रमक झाली असून आज मुंबईत याचे पडसाद उमटले. सातारा पोलीस अधीक्षकांबाबत विधानपरिषदेत मंत्र्यांनी आक्रमक भूमिका मांडल्यानंतर उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांच्या निलंबनाचे आदेश दिले. मात्र वस्तुस्थिती जाणून न घेता निलंबन करणं चुकीचं असल्याचं सांगत मंत्री जयकुमार गोरे यांनी पोलीस अधीक्षकांची पाठराखण केली.

## खरात प्रकरणी नाहक बदनामी, सुनेत्रा पवारांनी बैठक बोलावली, चाकणकरांना पदावरुन हटवण्याची शक्यता..

**मुंबई :** राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदावरून पायउतार झाल्यानंतर रुपाली चाकणकर यांचे महिला प्रदेशाध्यक्षपदही अडचणीत येण्याची शक्यता आहे. शनिवारी रात्री राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्रा पवार यांच्यासह पक्षातील शीर्षस्थ नेत्यांची बैठक झाली असून, त्यात महिला प्रदेशाध्यक्षपदाबाबत चर्चा करण्यात आल्याचे समजते. नाशिकच्या अशोक खरात प्रकरणात रुपाली चाकणकरांवर होत असलेल्या आरोपांमुळे ही चर्चा सुरु झाली आहे.नाशिकच्या अशोक खरात प्रकरणात रुपाली चाकणकर यांच्यावर होत असलेले आरोप पाहता त्यांना महिला आयोगाच्या अध्यक्षपदावरून पायउतार होण्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले होते. त्यानुसार शुक्रवारी चाकणकर यांनी आपला राजीनामा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे सुपूर्द केला. त्यानंतर शनिवारी सुनेत्रा पवार यांनी हा राजीनामा स्वीकारण्याच्या शिफारशीसह मुख्यमंत्र्यांकडे पाठवून दिल्याचे स्पष्ट केले. त्यानंतर रात्री उशिरा अध्यक्ष सुनेत्रा पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांची बैठक झाली.या बैठकीत अशोक खरात प्रकरणात राष्ट्रवादी पक्षाची नाहक बदनामी होत असून, ती रोखण्यासाठी काय पावले उचलली जावी यावरही चर्चा करण्यात आली. आयोगाच्या अध्यक्षपदाबरोबरच पक्षातील महिला प्रदेशाध्यक्षपदही रुपाली चाकणकर यांच्याकडे असून त्यावर बैठकीत चर्चा झाल्याचे समजते. पक्षातील नेत्यांकडूनही चाकणकर यांनी पक्षात पदावर राहू नये अशी दबक्या आवाजात चर्चा सुरू आहे. त्यामुळे विरोधकांकडून



आणखी टीका होऊ नये यासाठी चाकणकर यांना प्रदेशाध्यक्षपदावरून हटवावे का, यावरही चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली.दरम्यान, राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या सोमवारपासून सुरु होणाऱ्या शेवटच्या आठवड्यात भोंदूबाबा अशोक खरातच्या प्रकरणावरून विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत विरोधक चांगलेच राजकारण तापवण्याचे संकेत मिळत आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांचा राजीनामा घेतला असला तरी विरोधी पक्षांकडून हे प्रकरण लावून धरले जाण्याची शक्यता आहे.

# अजितदादांसाठी महायुती सरकारला वेळ नाही ? CM च्या अनुपस्थितीचे कारण देत महिनाभर अपघातावरील चर्चा टाळली

**मुंबई/वृत्तसंस्था :** माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या अखेरच्या आठवड्यात तरी चर्चा होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्यापासून दोन्ही 'राष्ट्रवादी'च्या नेत्यांकडून या विषयावर चर्चेची मागणी करण्यात येत आहे. मात्र, मुख्यमंत्र्यांच्या अनुपस्थितीचे कारण पुढे करून ती जवळपास चार आठवडे टाळली गेली. आता अखेरच्या आठवड्यातील तीन दिवसांच्या कामकाजात तरी यावर चर्चा होणार का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष आहे; तसेच मुख्यमंत्री यावर विशेष चर्चा घडवून आणतात, की अंतिम आठवडा प्रस्तावाच्या माध्यमातून केवळ उत्तर देऊन ही कोंडी फोडतात हे पाहावे लागणार आहे.अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूबाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार





शशिकांत शिंदे यांनी २७ फेब्रुवारी रोजी विधान परिषदेत स्थगन प्रस्ताव मांडला होता. त्यावर, याविषयी सभागृहाचे कामकाज बाजूला ठेवून चर्चा करण्याची मागणी केली. त्याला राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनीही दुजोरा दिला होता. सभापती राम शिंदे यांनी या विषयावर अल्पकालीन चर्चा घडवण्याची सूचना दिली होती. उपमुख्यमंत्र्याचा अशा संशयास्पद वातावरणात मृत्यू होऊनही त्याबाबत सरकार गंभीर नसल्याचा आरोप केला होता. तेव्हाही सभापतींनी याविषयी लवकरच निर्णय घेण्यात येईल, असे सांगितले. मात्र, त्यानंतर आक्रमक होऊन दोनदा आमदार शिंदे, मिटकरी, आमदार अनिल परब यांनीही चर्चा कधी होणार, याविषयी सभापती शिंदेंना विचारणा केली. मात्र, दर वेळी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून याविषयी निर्णय घेऊ, असे शिंदे यांनी स्पष्ट केले होते.१७ मार्चला आमदार मिटकरी यांनी, 'इतक्या महत्त्वाच्या विषयावर चर्चा होणार की नाही, हे एकदा सांगा,' या शब्दांत नाराजी व्यक्त केली होती. त्यावरही सभापतींनी अखेरच्या आठवड्यात चर्चा होण्याची अपेक्षा व्यक्त केली.अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या अखेरच्या आठवड्याला सोमवारपासून सुरुवात होत असून, अंतिम आठवड्यात केवळ तीन दिवसच कामकाज आहे. त्यामुळे या तीन दिवसांत चर्चा होणार का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. अमोल मिटकरी यांनी 'एक्स'वर याबाबत खदखदही व्यक्त केली. त्यांनी लिहिले, की सरकारकडून भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणाची चौकशी योग्य दिशेने सुरू आहे; पण त्याच वेळी अजितदादांच्या विषयावरही तितक्याच गांभीर्याने लक्ष राहणे गरजेचे आहे. दादांच्या विमान अपघाताची चर्चा ठरल्याप्रमाणे उद्याच्या कामकाजात व्हावी, ही विनंती. चर्चेची कुठलीही शक्यता नसल्यास विरोधकांकडून अंतिम आठवडा प्रस्तावाच्या माध्यमातून सरकारकडून विविध खात्यांवरील विषयांवर प्रश्न उपस्थित करून त्याबाबत उत्तर घेण्याचे आयुध आहे. मुख्यमंत्री अंतिम आठवड्याच्या उत्तराच्या माध्यमातून विरोधकांना शांत करतात का, याकडेही लक्ष असेल.


# मांजर पाळू देण्यास कुटुंबाचा नकार, डॉक्टर तरुणीने आयुष्य संपवलं, आई-आजी घरी नसताना टोकाचं पाऊल

**हैदराबाद :** एमबीबीएसचं शिक्षण पूर्ण केलेल्या 23 वर्षीय डॉक्टर तरुणीने जीव दिल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. कुटुंबाने आवडीची मांजर पाळण्यास नकार दिल्यामुळे तरुणीने टोकाचं पाऊल उचलल्याचा आरोप आहे. हैदराबादमध्ये ही काळीज पिळवटणारी घटना घडल्याचं उघडकीस आलं आहे. तेलंगणातील हैदराबाद शहरातील अलवाल येथील रहिवासी असलेल्या टी प्रिन्सी उर्फ श्रेष्ठा हिने आयुष्याची अखेर केली. शुक्रवारी संध्याकाळी ती राहत्या घरी मृतावस्थेत आढळली. तिची आई आणि आजी कामानिमित्त काही काळ बाहेर गेल्या होत्या. परत आल्यावर त्यांना लाडक्या लेकीने जीवाचं बरंवाईट करुन घेतल्याचं पाहायला मिळालं. यामुळे आई-आजीसह संपूर्ण कुटुंबाला मोठा धक्का बसला आहे.तीन आठवड्यांपूर्वी प्रिन्सीने एक मांजर घरी आणली होती. ती मांजर तिला कायमस्वरुपी घरी पाळायची होती. मात्र कुटुंबाचा याला विरोध होता. त्यावरुन प्रिन्सीचे घरच्यांशी वारंवार खटकेही उडत असत.शुक्रवारी प्रिन्सीची आई आणि आजी बाहेर गेल्या होत्या. घरात कोणीही नसल्याची संधी साधत तिने पंख्याला गळफास घेऊन आयुष्याची अखेर केली. आई-आजी परत आल्यावर त्यांना हे दृश्य पाहून धक्का बसला. तिची बॉडी पोस्टमार्टमसाठी गांधी हॉस्पिटलला नेण्यात आली. प्रिन्सीच्या आईने दिलेल्या जबाबाच्या आधारे पोलिसांनी संशयास्पद मृत्यू प्रकरणात तक्रार दाखल केली आहे. प्रिन्सीने घरात पाळीव मांजर आणली होती, त्यामुळे तिला सर्दी खोकला होऊ लागला. मात्र प्रिन्सीला मांजर घरात ठेवून घ्यायचीच होती, यावरुन आमच्यात वारंवार खटके उडायला लागलं, असं प्रिन्सीच्या आईने सांगितलं." अशी माहिती पोलिसांनी दिली.प्रिन्सी आपल्या वैद्यकीय परवान्यासाठी अर्ज करण्याची प्रक्रिया सुरु करणार होती. तसेच ती पदव्युत्तर प्रवेश परीक्षांची तयारीही करत होती, अशीही माहिती समोर येत आहे.दुसरीकडे, नवी मुंबईत घणसोली परिसरातील १४ वर्षीय शालेय विद्यार्थ्याने राहत्या घरात गळफास लावून आयुष्याची अखेर केली. ऐन परीक्षेच्या काळात घडलेल्या या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. प्रीत नवी मुंबई सिटी स्कूलमध्ये शिक्षण घेत होता. शुक्रवारी घरात कोणी नसताना त्याने टॉवेलच्या साहाय्याने गळफास घेतला. सायंकाळी पालक घरी परतले तेव्हा त्यांना प्रीतने गळफास घेतल्याचे दिसले. त्याला तातडीने रुग्णालयात नेण्यात आले.



# क्लिनिकमध्ये छुपा कॅमेरा बसवला, ४९ वर्षीय महिला डॉक्टरचं शूट

**राजकोट :** क्लिनिकमध्ये हिडन स्पाय कॅमेरा लावल्याप्रकरणी ३१ वर्षीय बीएचएमएस डॉक्टरला रविवारी अटक करण्यात आली. गुजरातमधील राजकोट शहरातील सायबर क्राइम पोलिसांनी ही कारवाई केली. साधू वासवानी रोडवर असलेल्या क्लिनिकमध्ये छुपा कॅमेरा बसवून आरोपी डॉक्टरने सहकारी महिला डॉक्टरला आक्षेपार्ह फूटेजवरुन ब्लॅकमेल केल्याचा आरोप आहे. आरोपीने तिच्याकडे २५ लाख रुपयांची खंडणी मागितली. याशिवाय अन्य काही रुग्णांचेही शूट करुन डॉक्टरने त्यांना धमकावल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.क्लिनिकमध्ये बल्ब होल्डरच्या मागे कॅमेरा लावून आरोपी डॉक्टर कमल नंदा याने ४९ वर्षीय महिला डॉक्टरच्या खासगी क्षणांचे चित्रिकरण केल्याचा आरोप आहे. याशिवाय तपासणी होताना किंवा गुप्तांगांवर इंजेक्शन लावले जात असताना महिला रुग्णांचे आक्षेपार्ह व्हिडिओही त्याने कॅमेरात कैद केल्याचा दावा केला जात आहे.तक्रारदारांच्या आरोपानुसार डॉ कमल नंदा याने हे व्हिडिओ नंतर शेअर केले. २५ लाख रुपये न दिल्यास व्हिडिओ क्लीप व्हायरल करण्याची धमकी दिली. तक्रारदाराने ५० हजार रुपयांचा एक हप्ता आधीच आरोपीला दिल्याची माहिती आहे.राजकोटच्या सायबर क्राइम विभागाच्या टीमने शनिवारी डॉ नंदाच्या क्लिनिकमध्ये शोधमोहीम राबवत त्याला अटक केली. आरोपी सात ते आठ वर्षांपासून प्रॅक्टिस करत असून ऑनलाईन कन्सल्टेशनही करतो. पोलिसांनी त्याचे मोबाईल आणि इतर इलेक्ट्रॉनिक डिव्हाईसही जप्त केली आहेत.डॉ नंदा इतर आरोपींच्या संपर्कात कसा आला, त्याने सर्वप्रथम कोणासोबत हे व्हिडिओ शेअर केले आणि हे फूटेज इतरत्रही प्रसारित केले गेले होते का, या बाबींचा तपास पोलिस अधिकारी करत आहेत. तसेच खंडणीद्वारे उकळलेल्या पैशांची आपापसांत वाटणी झाली होती का आणि इतर उपकरणांवर अतिरिक्त डेटा आहे का, ज्यात हजारो व्हिडिओ क्लिप्स समाविष्ट असण्याचा संशय आहे, याचीही ते छाननी करतील.गुप्त कॅमेरा बसवण्यामागील उद्देश आणि या कृत्यात अन्य कोणी आरोपीला मदत केली होती का, याचाही तपास सुरु असल्याचे पोलिसांनी सांगितले.



# गोड बोलून दारू पिण्यास बोलावलं, तरुणाला निर्घृणपणे संपवलं

**जळगाव :** जळगाव जिल्ह्यात घडणाऱ्या हत्येच्या घटनांमध्ये वाढ होत असून जळगाव जिल्ह्यात पुन्हा एकदा हत्येच्या घटनेनं खळबळ उडाली आहे. जळगाव शहरातील जैनाबाद परिसरात एका तरुणाचा काल रविवारी धारदार शस्त्राने पोटात वार करून गंभीर असलेल्या तरुणाचा आज उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला आहे. जळगाव जैनाबाद येथील रहिवासी नितीन काळे (वय ३५) आणि संशयित आरोपी श्याम सूर्यवंशी यांच्यात यापूर्वी वाद झाला होता. त्यावेळी श्यामने काचेची बाटली फोडून नितीनवर हल्ला केला होता. या प्रकरणाची केस न्यायालयात सुरु होती आणि त्यासाठी नितीन गोव्याहून जळगावात आला होता. केस मागे घेण्यासाठी श्यामकडून प्रचंड दबाव टाकला जात होता. मात्र, केस मागे घेतली नाही म्हणूनच श्यामने चॉपरने नितीनची हत्या केल्याचा आरोप मयताचे वडील नाना काळे आणि भाऊ राजू काळे यांनी केला आहे. तर श्यामने नितीनला दारू पिण्याच्या बहाण्याने घरी बोलावले आणि जुन्या वादातून त्याची हत्या केल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.नितीन हा त्याचे आई-वडील, पत्नी, मुलगा भाऊ-बहीण यांच्यासह शहरात राहत होता. काही महिन्यापूर्वी गोवा येथे कटलरीच्या दुकानात नोकरी मिळाल्यानं तो तेथे काम करून परिवाराचा उदरनिर्वाह करत होता.

# गप्पा-टप्पा सुरु असतानाच अचानक ट्रिगर दाबला अन.. मुंढव्यात गोळीबार

**पुणे :** आपण काय करतोय? याचं भान आपल्याला असायला हवं. तसेच प्रत्येक गोष्टीचं गांभीर्य असणं देखील आवश्यक आहे. विशेष म्हणजे पिस्तूल सारख्या गोष्टी सर्वसामान्य नागरिकांकडे असण्याचं कारण नाही. तरुणांनी आपल्या करियरकडे पाहणं जास्त आवश्यक आहे. पण काही तरुण गुन्हेगारीचा मार्ग निवडतात. त्यातून ते चुकीच्या मार्गाने पिस्तूल मिळवतात. त्यानंतर ते दहशत माजवण्याचा प्रयत्न करतात. पण ही पिस्तूल सर्वसामान्य परिसरात बाहेर काढली तर काय परिणाम होऊ शकतो? याचा प्रत्यय पुण्यात आलेला बघायला मिळतोय. पुण्यात एका पिस्तूलातून चुकून गोळी सुटली आणि ती अल्पवयीन मुलाच्या कंबरेला लागली. यामध्ये हा मुलगा गंभीर जखमी झाला आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.१८ मार्चला रात्री साडेनऊच्या सुमारास काही तरुण गुरुकृपा सोसायटी परिसरातील मोकळ्या जागेत एकत्र जमले होते. सर्वांमध्ये गप्पा-टप्पा सुरू असताना त्यांच्यापैकी एकाने खिशातून देशी बनावटीचे पिस्तूल बाहेर काढली. सुरुवातीला कुतूहल म्हणून ते एकमेकांना दाखवले जात होते. काही तरुणांनी ते हाताळूनही पाहिले. यानंतर पिस्तूल पुन्हा एका तरुणाच्या हातात आले. त्याने ते थेट एका अल्पवयीन मुलाच्या दिशेने रोखले. काही क्षण सगळे स्तब्ध झाले...



आणि अचानक ट्रिगर दाबला गेला. क्षणातच गोळी सुटली आणि ती मुलाच्या कंबरेत जाऊन लागली.गोळी लागल्याबरोबर मुलगा वेदनेने खाली कोसळला. परिसरात आरडाओरड आणि गोंधळ सुरू झाला. उपस्थित तरुणांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. काही जण घटनास्थळावरून पळून गेले, तर काहींनी जखमी मुलाला तातडीने रुग्णालयात हलवले. सध्या गोळीबारात जखमी मुलावर उपचार सुरू असून त्याची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे. डॉक्टरांकडून त्याच्यावर लक्ष ठेवण्यात येत आहे.दरम्यान, धक्कादायक घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी गेले. पोलिसांनी घटनेचा सखोल तपास केला. या घटनेप्रकरणी पोलिसांनी तिघांना अटक केली आहे. या प्रकरणात सहभागी असलेल्या एका अल्पवयीन मुलालाही ताब्यात घेण्यात आले आहे. पोलिसांनी आरोपीकडून पिस्तूल जप्त केले असून पुढील तपास सुरू आहे. मात्र त्यांच्याकडे पिस्तूल आले कुठून? अशा बेफिकीर घटना अजून किती घडणार? असा प्रश्न आता नागरिकांमध्ये उपस्थित होत आहे.

# भोंदू बाबा अशोक खरातचं आणखी एक कांड; जमिनीच्या वादातून शेतकऱ्याचा जीव घेतल्याचा आरोप

**नाशिक :** नाशिक शहरालगत असलेल्या व मुंबई आग्रा महामार्गापासून अगदी काही अंतरावर असलेल्या गवळणे येथील एका शेतकऱ्याने भोंदू बाबा अशोक खरात याच्यावर जमिनीच्या वादातून आपल्या भावाची हत्या केल्याचा आरोप केल्याने खळबळ उडाली आहे. खरात याने जमिनी हडपण्यासाठी हा कट रचल्याचा दावा पीडित शेतकऱ्याने केला आहे. कैलास जाधव असे या पीडित शेतकऱ्याचे नाव आहे.गवळणे येथील शेतकरी कैलास जाधव यांच्या कुटुंबाचा आणि अशोक खरात यांचा जमिनीवरून वाद सुरू होता. जाधव यांनी केलेल्या दाव्यानुसार, खरात याने फसवणूक करून त्यांची जमीन बळकावली होती. या वादावर न्यायालयात सुनावणी सुरू होती. मात्र न्यायालयाचा अंतिम निकाल अवघ्या दोन दिवसांवर असतानाच जाधव यांच्या भावाचा संशयास्पद अपघाती मृत्यू झाला.सन २०२२ साली विलास जाधव यांच्या भावाने अशोक खरात याच्याविरोधात पोलिसांत धाव घेऊन जीविताला धोका असल्याची तक्रार दिली होती. मात्र अशोक खरात उर्फ कॅप्टन याचे बड्या राजकीय नेत्यांशी आणि वरिष्ठ अधिकारी यांच्याशी जवळचे संबंध असल्याने पोलिसांनी या तक्रारीकडे दुर्लक्ष केले होते, असा आरोप जाधव यांनी केला आहे. आता या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे.भोंदू बाबा अशोक खरात याने नाशिकच्या पाथर्डी शिवारात अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी बळकवण्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. याच दरम्यान पाथर्डी गावांमधील जाधव कुटुंबीय यांना त्यांची जमीन नावावर करून घेण्या प्रकरणी अशोक खरात याने त्रास दिल्याचा आरोप देखील त्यांच्याकडून करण्यात येत आहे. त्याचदरम्यान विलास जाधव यांच्या भावाची हत्या अशोक खरातकडून हत्या करण्यात आली आहे, असा त्यांनी आरोप केला आहे. मात्र भोंदू बाबाचे संबंध अनेक मोठ्या लोकांशी असल्याने त्यावर कुठल्याही प्रकारची कारवाई झाली नसल्याचा दावा त्यांनी केला आहे.



# नियमावर अक्षर पटेलने केली टीका; आयपीएलपूर्वी मनातील खंत बोलून दाखवली

**मुंबई/वृत्तसंस्था :** आयपीएल 2026 ला 28 मार्च 2026 पासून सुरुवात होणार आहे. पहिला सामना हा रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरु आणि सनरायझर्स हैदराबादमध्ये रंगणार आहे. आता आयपीएलपूर्वी अनेक संघ मोठ मोठ्या घोषणा करताना दिसत आहेत. काही खेळाडूंना दुखापत झाली असल्यामुळे ते आयपीएलमधून बाहेर पडले आहेत. त्यांच्याऐवजी आता नवीन खेळाडू आयपीएलमध्ये सामील झाले आहेत. आता या सगळ्या दरम्यान दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार अक्षर पटेलने बीसीसीआयच्या एक नियमावर टीका केली आहे.दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार अक्षर पटेलने आयपीएल 2026च्या आधी 'इम्पॅक्ट प्लेयर रूल'ला आपला विरोध दर्शवला आहे. त्याला हा नियम आवडत नाही, असे त्याने म्हटले आहे. 'इम्पॅक्ट प्लेयर रूल' आयपीएल 2023 मध्ये लागू करण्यात आला होता आणि आता तो 2027 पर्यंत



सुरू राहील. यापूर्वी अनेक कर्णधारांनी या नियमाबद्दल नाराजी व्यक्त केली आहे.इम्पॅक्ट प्लेयर रूल'बद्दल अक्षर पटेल म्हणाला, "मला हा नियम आवडत नाही. मी निश्चितपणे एक अष्टपैलू खेळाडू आहे. पूर्वी, अष्टपैलू खेळाडूला फलंदाजी आणि गोलंदाजी दोन्हीसाठी संघात घेतले जात असे. हा नियम संघ व्यवस्थापनाला त्यांच्या गरजेनुसार फलंदाज किंवा गोलंदाज निवडण्याची मुभा देतो. त्यांना आश्चर्य वाटते की आम्हाला अष्टपैलू खेळाडूची गरज का आहे. म्हणूनच मला हा नियम आवडत नाही. पण हे आमच्या नियंत्रणात नाही. जर एखादा नियम असेल, तर तो आहे. वैयक्तिकरित्या, मला तो आवडत नाही.अक्षर पटेलच्या आधी अनेक खेळाडूंनी या नियमावर टीका केली आहे. यामध्ये रोहित शर्मा, एम.एस. धोनी, पंजाब किंग्सचे मुख्य प्रशिक्षक रिकी पाँटिंग, इंग्लंडचा सॅम करन आणि ऑस्ट्रेलियाचा माजी क्रिकेटपटू शेन वॉटसन यांचा समावेश आहे. या सर्वांचा असा विश्वास होता की या नियमामुळे अष्टपैलू खेळाडूंच्या भूमिकेवर परिणाम होईल. संघ अष्टपैलू खेळाडूंपेक्षा विशेषज्ञ फलंदाज किंवा गोलंदाजांना प्राधान्य देतात. बीसीसीआयने देशांतर्गत क्रिकेटमधून हा नियम काढून टाकला आहे.नाणेफेकीपूर्वी, दोन्ही संघांनी त्यांच्या प्लेइंग इलेव्हनची घोषणा करणे आवश्यक आहे, सोबतच चार खेळाडू इम्पॅक्ट प्लेयर पर्याय म्हणून जाहीर करावे लागतात. हे चार खेळाडू बदली खेळाडू असतात. संघ यापैकी कोणत्याही एका खेळाडूचा वापर करू शकतात. अशा प्रकारे, एक संघ सामन्यात 11 ऐवजी 12 खेळाडू मैदानात उतरवू शकतो. कोणत्याही परिस्थितीत 11 पेक्षा जास्त खेळाडू फलंदाजी किंवा गोलंदाजी करू शकत नाहीत. इम्पॅक्ट प्लेयर निवडण्यासाठी प्लेइंग इलेव्हनमधील एका खेळाडूला वगळावे लागते. अनेकदा, प्रथम फलंदाजी करताना संघ एक अतिरिक्त फलंदाज संघात घेतात. मग, जेव्हा ते गोलंदाजीसाठी येतात, तेव्हा ते एका फलंदाजाला वगळून त्यांच्या जागी गोलंदाजाला संधी देतात.

## बुमराहने उडवली मुंबई इंडियन्सची झोप

**मुंबई/वृत्तसंस्था :** टीम इंडियाला सलग दुसऱ्यांदा टी-20 विश्वचषक जिंकून दिल्यानंतर, स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह आता आयपीएलमध्ये परतणार आहे. बुमराह आणि मुंबई इंडियन्सचे चाहते त्याला पुन्हा मैदानावर पाहण्यासाठी उत्सुक झाले आहेत. पाच वेळचे चॅम्पियन असलेल्या मुंबईला, जी गेल्या पाच वर्षांपासून विजेतेपदाच्या प्रतीक्षेत आहे, आपल्या स्टार वेगवान गोलंदाजाची नितांत गरज आहे. मात्र, हंगाम सुरू होण्यापूर्वीच Jasprit Bumrah ने सर्वांच्या चिंता वाढवल्या आहेत.एका वृत्तानुसार, स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह आयपीएल 2026 सुरू होण्याच्या सुमारे एक आठवडा आधी अचानक सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये दाखल झाला आहे. यामुळे बुमराह पुन्हा दुखापत झाली आहे का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. मुंबई इंडियन्सला बुमराहशिवाय हंगामाची सुरुवात करावी लागेल का? हा प्रश्न यासाठी निर्माण झाला आहे कारण भारतीय खेळाडू सहसा फिटनेसच्या समस्या असतील तेव्हाच सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये जातात.बुमराहच्या तंदुरुस्तीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे, कारण मुंबई इंडियन्सचे सर्व खेळाडू तयारीमध्ये व्यस्त असताना, बुमराह एकदाही संघात सामील झालेला नाही. प्रशिक्षक महेला जयवर्धने यांनी




स्वतः जाहीर केल्यानुसार, टी-20 विश्वचषकात सहभागी झालेल्या बुमराहसह सर्व भारतीय आणि परदेशी खेळाडूंना अतिरिक्त विश्रांती देण्यात आली होती. कर्णधार हार्दिक पांड्या, सूर्यकुमार यादव आणि तिलक वर्मा संघात सामील झाले असताना, बुमराह सध्या संघाचा भाग नाही.32 वर्षीय अनुभवी वेगवान गोलंदाज बुमराह यापूर्वीही तंदुरुस्तीच्या समस्यांशी झुंजत आहे. यामुळे तो आयपीएल 2023 मध्ये सहभागी होऊ शकला नाही आणि त्यापूर्वी, तो टी-20 विश्वचषक 2022 साठीच्या संघाचाही भाग नव्हता. इतकेच नाही तर, गेल्या वर्षी इंग्लंड दौऱ्यावरील कसोटी मालिकेदरम्यान त्याला दुखापत झाली होती आणि काही आठवड्यांसाठी संघाबाहेर होता. बीसीसीआय केंद्रातील त्याच्या अचानक आगमनामुळे प्रश्न निर्माण होत आहेत. मुंबईला आपला पहिला सामना 29 मार्च रोजी कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध खेळायचा आहे.

## स्टार्कचा सहभाग ऑस्ट्रेलियन क्रिकेट बोर्डच ठरवणार

**मुंबई :** आयपीएल 2026 मधून ऑस्ट्रेलियन खेळाडूंची अनुपस्थिती हा सध्या चर्चेचा मुख्य विषय आहे. सनरायझर्स हैदराबादचा कर्णधार पॅट कमिन्स सुरुवातीच्या सामन्यांमध्ये खेळणार नाही. वेगवान गोलंदाज जॅक एडवर्ड्सलाही स्पर्धेतून वगळण्यात आले आहे. दरम्यान, दिल्ली कॅपिटल्सचा Mitchell Starc आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळूरचा जोश हेझलवूड यांच्याबाबत कोणतीही माहिती उपलब्ध नाही. ही स्पर्धा 28 मार्चपासून सुरू होत आहे. दरम्यान, दिल्ली कॅपिटल्सने स्टार्कबाबत एक महत्त्वाची माहिती दिली आहे. दिल्ली कॅपिटल्सचे प्रशिक्षक हेमांग बदानी यांनी सांगितले की, क्रिकेट ऑस्ट्रेलियाने अद्याप मिचेल स्टार्कला एनओसी दिलेले नाही. त्यामुळे, फ्रँचायझीला आशा आहे की 1 एप्रिलपूर्वी ते मिळेल. पत्रकार परिषदेदरम्यान बदानी म्हणाले, "आम्ही अजूनही क्रिकेट ऑस्ट्रेलियाकडून एनओसीची वाट पाहत आहोत. ते मिळाल्यावर, तो आमच्या संघात कधी सामील होऊ शकतो हे आम्ही पाहू. हा ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाज संघात सामील होईल. सध्या, हे प्रकरण एनओसीच्या प्रतीक्षेत आहे.

## इशानला संघातील खेळाडूनेच डिवचलं

**मुंबई/वृत्तसंस्था :** इंडियन प्रीमियर लीगच्या 19व्या हंगामात सनरायझर्स हैदराबाद संघावर सर्वांच्या नजरा असतील, ज्या संघात अनेक स्फोटक खेळाडू आहेत. पॅट कमिन्सच्या अनुपस्थितीत, सनरायझर्स हैदराबादने IPL 2026 च्या सुरुवातीच्या काही सामन्यांसाठी यष्टीरक्षक-फलंदाज Ishan Kishan कर्णधार म्हणून नियुक्त केले आहे. आगामी हंगामाची पूर्ण तयारी करण्यासाठी, सनरायझर्स हैदराबादने 21 मार्च रोजी आपल्या घरच्या मैदानावर एक सराव सामना खेळला, ज्यात दोन्ही डावांमध्ये 500 हून अधिक धावा केल्या. या सामन्यात कर्णधार इशान किशन बाद झाल्याचा एक व्हिडिओ व्हायरल होत आहे.या सराव सामन्यात इशान किशनच्या बॅटने 24 चेंडूंमध्ये 72 धावांची शानदार खेळी सादर केली, ज्यात त्याची नैसर्गिक आक्रमक फलंदाजी शैली दिसून आली. या सामन्याच्या दुसऱ्या डावात, जेव्हा इशान किशन फलंदाजी करत होता, तेव्हा त्याने फिरकी गोलंदाज झीशान अन्सारीच्या आठव्या षटकात दोन चौकार आणि दोन षटकारांसह 4 चेंडूंमध्ये 20 धावा केल्या. यानंतर, इशान किशनने पाचव्या चेंडूवर एक मोठा फटका मारण्याचा प्रयत्न केला, पण तो डीप स्क्वेअर लेगला झेलबाद झाला. विकेट घेतल्यानंतर झीशान अन्सारी खूप संतापला. यष्टीरक्षकाने



त्याला थांबवण्याचा प्रयत्न केला, पण झीशान अन्सारी इशान किशनच्या जवळ गेला आणि पॅव्हेलियनकडे बोट दाखवत रागाने त्याला तंबूत पाठवले.विकेट घेतल्यानंतर झीशान अन्सारीला इतका संतापलेला पाहून सर्वांना आश्चर्य वाटले, पण इशान किशनने हसून ते टाळले आणि बाद झाल्यानंतर पॅव्हेलियनमध्ये परतला. या सराव सामन्यात अभिषेक शर्मानेही आपल्या फलंदाजीचे कौशल्य दाखवत एकूण 94 धावा केल्या. हेनरिक क्लासेननेही 49 धावा केल्या, तर सलील अरोराने 16 चेंडूंमध्ये 47 धावा केल्या. सनरायझर्स हैदराबादच्या संघात अजून एका महत्त्वाच्या खेळाडूचे आगमन व्हायचे आहे, ट्रॅव्हिस हेडच्या आगमनाने कोणत्याही संघाच्या गोलंदाजांच्या मनात दहशत निर्माण होऊ शकते.आयपीएलला आता 28 मार्चपासून सुरुवात होणार आहे. पहिलाच सामना रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरु आणि सनरायझर्स हैदराबादमध्ये रंगणार आहे.

# निवृत्तीच्या प्रश्नावर धोनीने दिलेल्या उत्तराची चर्चा..





**मुंबई/वृत्तसंस्था :** महेंद्रसिंग धोनी वयाच्या 44 व्या वर्षी 2026 च्या आयपीएलमध्ये खेळणार आहे. तो Chennai Super Kings संघाचा भाग असून एक अनकॅप्ड खेळाडू म्हणून खेळत आहे. ऋतुराज गायकवाड संघात परतल्यामुळे तो या हंगामात सीएसकेचे कर्णधारपद भूषवणार नाही. गेल्या हंगामात, गायकवाड दुखापतीमुळे बाहेर पडल्याने धोनीला पुन्हा कर्णधारपदाची जबाबदारी घ्यावी लागली होती. प्रत्येक हंगामाच्या आधी आणि नंतर धोनीच्या आयपीएलमधून निवृत्तीबद्दल जोरदार चर्चा आणि अटकळ सुरू असते. यावेळीही तशीच परिस्थिती आहे. 22 मार्च रोजी सीएसकेच्या एका फॅन इव्हेंटमध्ये MS धोनी यावर एक टिप्पणी केली.

तमिळ अभिनेता शिवकार्तिकेयनने सीएसकेच्या 'रोअर' या कार्यक्रमात धोनीला आयपीएल खेळण्याबद्दल आणि निवृत्तीबद्दल प्रश्न विचारला. तो म्हणाला, "काही हंगामांपूर्वी तुम्हाला निवृत्तीबद्दल विचारले होते, पण तुम्ही नकार दिला. अशा परिस्थितीत, तुम्ही खेळत राहावे अशी सर्वांची इच्छा आहे." त्याने धोनीला वयाच्या 60 व्या वर्षीही खेळत राहण्याचा आग्रह केला. यावर भारताचा माजी कर्णधार सुरुवातीला हसला. त्यानंतर तो म्हणाला की हे, "खूप कठीण होईल. त्याच्या वयात, आता फक्त अधोगतीच आहे, प्रगती नाही. पण मी प्रयत्न करेल." यामुळे शिवकार्तिकेयन आणि स्टेडियममधील चाहत्यांच्या चेहऱ्यावर हास्य उमटले.धोनी 2020 मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त झाला. त्याचा शेवटचा एकदिवसीय सामना 2019 विश्वचषक स्पर्धेतील न्यूझीलंडविरुद्धचा उपांत्य फेरीचा सामना होता. त्याचा शेवटचा टी-20 आंतरराष्ट्रीय सामना फेब्रुवारी 2019 मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध होता. डिसेंबर 2014 मध्ये कसोटी क्रिकेटमधून निवृत्त झाला. त्यावेळी तो भारतीय संघाचा कर्णधार होता.धोनी 2008 मध्ये सीएसके संघात सामील झाला. 2016 आणि 2017 च्या हंगामात, जेव्हा स्पॉट-फिक्सिंगमुळे चेन्नईवर दोन वर्षांची बंदी घालण्यात आली होती, तेव्हा तो रायझिंग पुणे सुपरजायंट्सकडून खेळला. या दोन हंगामांव्यतिरिक्त, तो नेहमीच सीएसकेकडून खेळला. या काळात, त्याने 2021 पर्यंत संघाचे कर्णधारपद सातत्याने भूषवले. 2022 मध्ये रवींद्र जडेजाकडे संघाची सूत्रे सोपवण्यात आली, पण धोनीला पुन्हा ती सांभाळावी लागली. त्यानंतर, 2023 मध्ये त्याने चेन्नईला पाचवे आयपीएल विजेतेपद मिळवून दिले.

# महिला खासदार होती २ मुलांच्या बापाच्या प्रेमात; खोलीत घुसून जीवाचं बरंवाईट करण्याची धमकी..

दिग्गज व्यक्ती त्यांच्या कामामुळे कमी पण खासगी आयुष्यामुळे कायम चर्चेत असतात. आता देखील एका महिला खासदाराच्या खासगी आयुष्याच्या चर्चांनी जोर धरला आहे. दोन मुलांच्या बापाच्या प्रेमात असलेल्या महिला स्वतःच्या जिवाचं बरंवाईट करायला देखील निघालेली...सध्या ज्या महिला खासदाराच्या खासगी आयुष्याच्या चर्चांनी जोर धरला आहे. त्या महिला खासदार दुसऱ्या तिसऱ्या कोणी नाही तर, हिमाचलच्या मंदी मतदार संघातून निवडून आलेल्या खासदार कंगना राणौत आहे... राजकारणार प्रवेश करण्यापूर्वी कंगना बॉलिवूडमध्ये सक्रिय होत्या. बॉलिवूडमध्ये देखील कंगना यांनी अनेक प्रसिद्ध आणि लोकप्रिया अभिनेत्यांसोबत स्क्रिन शेअर केली. एवढंच नाहीतर, बॉलिवूडमध्ये स्वतःची ओळख भक्कम करत असताना





कंगना यांचा नाव अनेक अभिनेत्यांसोबत जोडण्यात आलं. पण कोणत्या अभिनेत्यासोबत त्यांचं नातं लग्नापर्यंत पोहोचलं नाही. एक लोकप्रिय अभिनेता आणि दोन मुलांचा बाप असलेल्या अजय देवगण याच्यासोबत देखील कंगना रिलेशनशिपमध्ये होत्या... असं अनेकदा सांगण्यात आलं आहे.वन्स अपॉन अ टाइम इन मुंबई' सिनेमाच्या शुटिंग दरम्यान दोघांची ओळख झाली आणि ही ओळख कालांतराने प्रेमात बदलली. अनेक वर्ष अजय आणि कंगना रिलेशनशिपमध्ये होते. पण दोघांच्या अफेअरच्या चर्चा तेव्हा रंगल्या जेव्हा अजय याने सिनेमाच्या निर्मात्यांवर सिनेमात कंगना हिला कास्ट करण्यासाठी दबाव टाकला. याच कारणामुळे कंगना 'रास्कल' आणि 'तेज' सिनेमात देखील अजय याच्यासोबत झळकली. जेव्हा कंगना आणि अजय यांच्या अफेअर बद्दल अभिनेत्री काजोल हिला कळलं, तेव्हा अभिनेत्रीने अजय याला धमकी दिला... काजोल हिने अजय याला स्पष्ट शब्दात सांगितलेलं, कंगनाला सोडलं नाही तर, मुलांसोबत घर सोडून जाईल... अशात अजय याने कुटुंबियांना प्राधान्य दिलं आणि कंगना यांच्यासबोत असलेले सर्व संबंध मोडले.रिपोर्टनुसार, अजय याच्या प्रेमात कंगना पूर्णपणे गुंतलेल्या होत्या... अशात कंगना यांनी एक पूर्ण मर्यादा ओलांडल्या होत्या. सिनेमाचं शुटिंग पूर्ण झाल्यानंतर अजय रात्री त्याच्या हॉटेलच्या खोलीत परतला... त्यानंतर काही वेळात कंगना देखील अभिनेत्यांच्या खोलीत परतल्या... तेव्हा कंगना पूर्ण नशेत होत्या. त्यांना एका जागी नीट उभं देखील राहता येत नव्हतं... अजय अभिनेत्रीला परत जाण्यास सांगत होता...

पण त्या रात्री कंगना, अजय याला धमकी देऊ लागल्या. जर आपल्या नात्याबद्दल कोणता विचार केला नाही तर, हताची नस कापून घेईल..., पण तेव्हा अजय याने परिस्थिती सांभाळली आणि दोघांनी या नात्याचा अंत केला. आज कंगना राजकारणात सक्रिय आहे. शिवाय अनेक मुद्द्यांवर स्वतःचं मत देखील मांडत असते.

## बॉक्स ऑफिसवर 'धुरंधर २'चं वादळ

सध्या थिएटरपासून सोशल मीडियापर्यंत सर्वत्र 'धुरंधर: द रिव्हेंज' या चित्रपटाचीच जोरदार चर्चा आहे. दमदार कथा, अभिनय आणि दिग्दर्शन यांच्या जोरावर या चित्रपटाने प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. अगदी पहिल्या दिवसांपासून प्रेक्षकांनी थिएटरमध्ये गर्दी करायला सुरुवात केली. प्रदर्शनाच्या चौथ्या दिवशी 'धुरंधर 2'ने रेकॉर्डब्रेक कमाई करत सर्वांनाच थक्क केलं आहे. रणवीर सिंहची मुख्य भूमिका असलेल्या या स्पाय थ्रिलरने बॉक्स ऑफिसवर नवे विक्रम रचले आहेत. रणवीरच्या करिअरमधील हा सर्वांत यशस्वी चित्रपट ठरला आहे. यामध्ये त्याच्यासोबत अर्जुन रामपाल, आर. माधवन, संजय दत्त, राकेश बेदी, सारा अर्जुन यांच्याही भूमिका आहेत.आदित्य धर दिग्दर्शित 'धुरंधर: द रिव्हेंज' हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर यशस्वी



होईल अशी आधीपासूनच चर्चा होती. बॉक्स ऑफिसवर सध्या तसंच घडताना दिसतंय. 'सॅकनिल्क'ने दिलेल्या वृत्तानुसार, प्रदर्शनाच्या चौथ्या दिवशी या चित्रपटाच्या कमाईत लक्षणीय वाढ झाली आहे. रविवारी 'धुरंधर 2'ने देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर 103 कोटी रुपयांहून अधिक कमाई केली. ही गेल्या चार दिवसांतील दुसरी सर्वाधिक कमाई ठरली. यामुळे या चित्रपटाचं बॉक्स ऑफ कलेक्शन आता 450 कोटींच्या घरात पोहोचला आहे. रविवारी 'धुरंधर 2'चे तब्बल 20,100 शोज होते.धुरंधर : द रिव्हेंज'ने प्रदर्शनाच्या पहिल्याच आठवड्यात देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर 400 कोटी रुपयांहून अधिक कमाई करून नवीन विक्रम रचला आहे. आजवर कोणत्याच हिंदी चित्रपटाने इतकी मोठी ओपनिंग वीकेंड कमाई केलेली नव्हती. आदित्य धर लिखित आणि दिग्दर्शित या चित्रपटात रणवीर सिंहने भारतीय गुप्तहेर हमजा अली मजारीची भूमिका साकारली आहे. पाकिस्तानच्या ल्यारीमधील दहशतवादी नेटवर्कमध्ये शिरून तो त्यांचा खात्मा करतो. हा एक पॅन इंडिया चित्रपट असून हिंदीसह तमिळ, तेलुगू, मल्याळम आणि कन्नड भाषेतही तो प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाची सर्वाधिक कमाई ही हिंदी भाषेतच झाली आहे.

## सैफचा चित्रपट त्यात विलनचं नाव तैमूर

सैफ अली खान बॉलीवूडच्या दिग्गज कलाकारांपैकी एक आहे. त्याने आपल्या करिअरमध्ये एकापेक्षाएक सरस सिनेमे दिले आहेत. सैफ अली खान चित्रपटांशिवाय आपल्या कुटुंबामुळे सुद्धा चर्चेत असतो. त्याचा मुलगा तैमूर याची नेहमीच मीडियामध्ये चर्चा असते. आता आम्ही तुम्हाला सैफ अली खानचा एक चित्रपट आणि त्यातल्या विलनबद्दल सांगणार आहोत. 23 मार्च 2012 रोजी सैफ अली खानचा स्पाय थ्रिलर चित्रपट थिएटरमध्ये रिलीज झाला. त्या चित्रपटाचं नाव होतं एजंट विनोद. सैफ अली खानने या चित्रपटात फक्त मुख्य भूमिकाच केली नाही, तर त्याने निर्मिती सुद्धा केली होती. श्रीराम राघवन या चित्रपटाचे दिग्दर्शक होते. जेम्स बॉन्ड स्टाइलमध्ये या चित्रपटाची एक्शन-पॅक्ड स्टोरी होती. यात सैफ एजंट विनोदच्या रोलमध्ये दिसला. करीना कपूरने त्याच्या सोबत परवीन बिल्ललचा रोल प्ले केलेला. चित्रपटात ग्लोबल कॉन्सपिरेसी, हाय-वोल्टेज एक्शन सीक्वेंस आणि स्टायलिश लोकेशन्स भरपूर होते.



## नोरा फतेहीला भारत सोडावं लागणार? वर्क परमिट होणार रद्द? मंत्रालयात पोहोचली १० वकिलांची टीम

अभिनेत्री नोरा फतेही तिच्या एका गाण्यामुळे वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. 'केडी डेविल' या कन्नड चित्रपटात तिच्यावर चित्रित झालेल्या 'सरके चुनर तेरी सरके' या गाण्याचे बोल अश्लील असल्याचा आरोप झाला. त्यानंतर हे गाणं सर्व प्लॅटफॉर्म्सवरून हटवण्यात आलं. हे प्रकरण इथेच मिटलं नसून आता 10 वकिलांची एक टीम थेट गृह मंत्रालयाच्या संपर्कात असल्याचं वृत्त समोर येत आहे. त्यांनी गृह मंत्रालयाकडे थेट नोराचं वर्क परमिट (कामाचा परवाना) रद्द करण्याची मागणी केली आहे. इतकंच नव्हे तर नोरा फतेहीला भारतातून डिपोर्ट केलं जावं, अशी मागणी या वकिलांनी केली आहे. 'सरके चुनर' या गाण्याचे बोल अत्यंत अश्लील असल्याचा आरोप करत याआधी राष्ट्रीय महिला आयोगाकडे तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानंतर हे गाणं हटवण्यात आलं आणि त्याचे बोल बदलण्याची सूचना देण्यात आली. तर दुसरीकडे गीतकार रकीब आलमने दिग्दर्शकांवर याचं खापर फोडलं आहे. दिग्दर्शक प्रेमने कन्नड भाषेतील मूळ गाण्याला जसंच्या तसं भाषांतर करून द्यायला सांगितल्याचा दावा त्याने केला आहे.मीडिया रिपोर्ट्सनुसार, नोरा फतेहीविरोधात गृह मंत्रालयाशिवाय माहिती व प्रसारण मंत्रालय, सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशन (CBFC), इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय आणि राष्ट्रीय महिला आयोगाकडेही तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत. हे गाणं नोरा आणि संजय दत्त यांच्यावर चित्रित करण्यात आलं आहे. त्यामुळे संजय दत्त किंवा चित्रपटाच्या निर्मात्यांवर कोणतीच कारवाई का होत नाहीये, असाही सवाल उपस्थित होत आहे. वकिलांनी त्यांच्या याचिकेत आरोप केला आहे की, "सरके चुनर हे गाणं अत्यंत अश्लील, महिलांच्या प्रतिष्ठेचा अपमान करणारं, सार्वजनिक नैतिकतेचा अपमान करणारं आहे. नोराने अशा प्रकारच्या गाण्याशी संबंध जोडून भारतात काम करण्याच्या तिच्या विशेषाधिकाराचा गैरवापर केला आहे." वकिलांनी याचिकेत परदेशी कायदा, 1946 च्या तरतुदींचाही उल्लेख केला आहे. ज्या परदेशी नागरिकांच्या कृतींमुळे सार्वजनिक सभ्यता किंवा सुव्यवस्थेला बाधा येऊ शकतं, त्यांच्यावर कारवाई करण्याचा अधिकार सरकारला आहे, असं त्यात म्हटलंय.गाण्यावरून झालेल्या वादानंतर नोराने इन्स्टाग्रामवर व्हिडीओ पोस्ट करत या विषयावर प्रतिक्रिया दिली होती. "मी मूळ कन्नड भाषेतील गाण्यावर डान्स केल्याने मला त्या गाण्याचे बोल माहीत नव्हते. नंतर निर्मात्यांनी ते हिंदीत भाषांतर करून तसंच प्रदर्शित केलं, ज्याबद्दल मला कोणतीच कल्पना नव्हती. मी हे गाणं तीन वर्षांपूर्वी चित्रित केलं होतं. तेव्हा मी त्याला होकार दिला होता, कारण तो एका मोठ्या चित्रपटाचा भाग होता आणि त्यात संजय दत्तचीही भूमिका होती. त्यामुळे अशा संधीला नाही म्हणणं मला योग्य वाटत नव्हतं. मला वाटलं होतं की हे गाणं 'नायक नही खलनायक हूँ मै'चा रिमेक आहे. मला कन्नड भाषा समजत नाही, त्यामुळे त्यांनी जे सांगितलं त्यावर मी विश्वास ठेवला. गाण्याच्या हिंदी डबिंगसाठी किंवा गाण्याचे बोल बदलण्यासाठी त्यांनी माझी परवानगी घेतली नव्हती", असं स्पष्टीकरण नोराने दिलं होतं.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अनोळखी इसमाचा मृत्यू; ओळखणाऱ्यांनी संपर्क करण्याचे आवाहन

**जनसंचलन/बुलढाणा**

पोलीस स्टेशन, बुलढाणा शहर परिसरातील केळवद शिवार येथून एका अनोळखी इसमास उपचारासाठी सामान्य रुग्णालय, बुलढाणा येथे दाखल करण्यात आले होते. या इसमाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दि. १९ रोजी सुमारे ३५ वर्षे वयाचा एक अनोळखी इसम केळवद शिवार येथे आढळून आला. त्या इसमास १०८ रुग्णवाहिकेद्वारे जिल्हा सामान्य रुग्णालय, बुलढाणा येथील अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले होते. उपचार सुरू असताना दि. २२ रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजता त्याचा मृत्यू झाला. सदर इसमाजवळ कोणतीही ओळख पटविणारी कागदपत्रे आढळून आलेली नसून त्याचे नातेवाईक अद्याप समोर आलेले नाहीत. त्यामुळे संबंधित व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध घेण्यासाठी नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे. मृत इसमाचे वर्णन याप्रमाणे : रंग सावळा, वय अंदाजे ३५ वर्षे, उंची सुमारे ५ फूट ३ इंच, बांधा सडपातळ, इसमाच्या अंगावर लाल रंगाचा शर्ट व काळ्या रंगाची पॅन्ट आहे. अशा वर्णनाशी साधर्म्य असलेल्या व्यक्तीची ओळख पटल्यास त्वरित शासकीय रुग्णालय पोलीस चौकी, बुलढाणा येथे किंवा एएसआय वाणी मो.क्र. ९८५०९२३१०१, नरेद्र रोटे ९६२३२४३७३३ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# संग्रामपूर, चिखली व मेहकर तालुक्यातील रिक्त ग्रामपंचायत सदस्य पदांसाठी पोटनिवडणूक जाहीर

**जनसंचलन/बुलढाणा**

राज्य निवडणूक आयोगाकडून घोषीत केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार जिल्ह्यातील १३ तालुक्यांतील ५९ ग्रामपंचायतींच्या रिक्त थेट सरपंच व सदस्यांच्या पोट निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये संग्रामपूर तालुक्यातील चार रिक्त पद, चिखली तालुक्यातील सहा पदे तर मेहकर तालुक्यातील चार ग्रामपंचायतींच्या रिक्त थेट सरपंच व सदस्यांच्या पोट निवडणूकीचा कार्यक्रम जाहिर झाला आहे. या ग्रामपंचायतींमध्ये आचारसंहिता लागू असून निवडणूक आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन तहसिलदार तथा ग्रामपंचायत निवडणूक अधिकारी यांनी केले आहे. संग्रामपूर तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या सरपंच/सदस्य रिक्त पदांचे गावे : मारोडा ग्रामपंचायत प्रभाग क्र.३(अनुसूचित जमाती), धामनगांव ग्रामपंचायत प्रभाग क्र.२(ना.मा.प्र.प्रवर्ग),वकाणा ग्रामपंचायत प्रभाग क्र.२( ना.मा.प्र.प्रवर्ग महिला व सर्वसाधारण प्रवर्गातील) असे चार रिक्त ग्रामपंचायत सदस्य पदाच्या जागासाठी निवडणूक होणार आहे. मेहकर तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या सरपंच/सदस्य रिक्त पदांचे गावे : ग्रामपंचायत पारडा, ग्रामपंचायत पेनटाकळी, ग्रामपंचायत वाग्देव व ग्रामपंचायत दुर्गबोरी असे




चार रिक्त ग्रामपंचायत सदस्य पदाच्या जागासाठी निवडणूक होणार आहे. चिखली तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या सरपंच/सदस्य रिक्त पदांचे गावे : थेट सरपंच पदासाठी कव्हळा ग्रामपंचायत(ना.मा.प्र), कोनड ग्रामपंचायत(ना.मा.प्र./स्त्री), किन्ही सवडत ग्रामपंचायत(अनुसुचित जमाती) तर ग्रामपंचायत सदस्य पदासाठी किन्हीनाईक ग्रामपंचायत प्रभाग क्रमांक १ व ३ (अ.ज. स्त्री), बोरगाव वसु ग्रामपंचायत (अ.जा.) असे सहा रिक्त ग्रामपंचायत थेट सरपंच व सदस्य पदाच्या जागासाठी निवडणूक होणार आहे. निवडणूक कार्यक्रम याप्रमाणे : निवडणूकीची अधिसूचना सोमवार दि. ३० मार्च २०२६ रोजी संबंधित तहसिल कार्यालय व ग्रामपंचायत कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल. या कार्यक्रमानुसार निवडणूकीकरीता नामनिर्देशनपत्र दि. ७ ते १३ एप्रिल २०२६ पर्यंत सकाळी ११ वाजेपासून ते दुपारी ३ वाजेदरम्यान स्वीकारले जाणार आहे. नामनिर्देशन पत्र छाननी बुधवार दि. १५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजूपासून छाननी संपेपर्यंत. दि. १७ एप्रिल २०२६ रोजी नामनिर्देशन अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत ठेवण्यात आली आहे. या निवडणूकीचे मतदान मंगळवार दि. २८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायं ५.३० वाजेपर्यंत होणार असून मतमोजणी बुधवार दि. २९ एप्रिल २०२६ रोजी करण्यात येणार आहे, असे प्रसिद्धी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# अण्णासाहेब पाटील यांना पुण्यतिथींनिमित्त अभिवादन

**जनसंचलन/बुलढाणा**




कष्टकरी समाजाचे कैवारी व मराठा क्रांतीसूर्य स्व. आमदार अण्णासाहेब पाटील यांच्या ४४ व्या पुण्यतिथीनिमित्त अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ, जिल्हा कार्यालय बुलढाणा येथे अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. स्व. अण्णासाहेब पाटील यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. त्यांच्या सामाजिक कार्याचा व कष्टकरी समाजासाठी दिलेल्या योगदानाचा यावेळी गौरवपूर्वक उल्लेख करण्यात आला. यावेळी जिल्हा कौशल्य विकास मार्गदर्शन केंद्र, बुलढाणा येथील सहायक आयुक्त गणेश बिटोडे, जिल्हा समन्वयक पुरुषोत्तम अंभोरे, वैभव मुंढे, सुरज जगताप, कर्मचारी वर्ग व महामंडळाचे लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एचपीव्ही लस सुरक्षित; अफवांवर विश्वास ठेवू नका - जिल्हा आरोग्य विभागाचे आवाहन

**जनसंचलन/बुलढाणा**

महिलांमध्ये वाढत असलेल्या गर्भाशय मुखाच्या कर्करोगावर प्रभावी प्रतिबंध करण्यासाठी शासनामार्फत राबविण्यात येत असलेली एचपीव्ही () लसीकरण मोहीम पूर्णपणे सुरक्षित व परिणामकारक असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांनी दिली आहे. सध्या समाजमाध्यमांवर एचपीव्ही लसीबाबत विविध अफवा पसरवल्या जात असून त्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होत आहे. मात्र, नागरिकांनी अशा अपप्रचारावर विश्वास न ठेवता केवळ अधिकृत आरोग्य विभागाच्या माहितीलाच प्राधान्य द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या मोहिमेअंतर्गत १४ ते १५ वर्ष वयोगटातील मुलींना मोफत एचपीव्ही लस दिली जात आहे. ही लस गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरत असून लसीकरण पूर्णतः ऐच्छिक आहे. तसेच, पालकांची संमती घेतल्यानंतरच लसीकरण करण्यात येत असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) बुलढाणा अनिल आकाळ यांनीही या मोहिमेचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थिनींच्या आरोग्याच्या दृष्टीने ही मोहीम अत्यंत आवश्यक असून सर्व मुख्याध्यापक, शिक्षक आणि पालकांनी यासाठी सक्रिय सहकार्य करावे व विद्यार्थिनींना लसीकरणासाठी प्रोत्साहित करावे, असे त्यांनी सांगितले. एचपीव्ही लसीकरण सुविधा सर्व शासकीय रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये उपलब्ध आहेत. लाभार्थ्यांची नोंदणी व लसीकरणाचे प्रमाणपत्र वितरण



जिल्हा शिक्षणाधिकारी माध्यमिक बुलढाणा श्री. अनिल आकाळ

डिजिटल पद्धतीने करण्यात येत आहे. जिल्हा आरोग्य विभागामार्फत सर्व नागरिक आणि पालकांना आवाहन करण्यात आले आहे की, अफवांना बळी न पडता आपल्या मुलींचे वेळेत लसीकरण करून त्यांना गंभीर आजारापासून सुरक्षित करावे.

# राज्य शासनाच्या उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार-२०२५ साठी प्रवेशिका पाठविण्याकरीता मुदतवाढ

**जनसंचलन/ बुलढाणा**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात येत आहे. या स्पर्धेसाठी दिनांक १ जानेवारी, २०२५ ते ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/छायाचित्रे/ वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात येत आहेत. प्रवेशिका मागविण्याचा अंतिम दिनांक १५ मार्च, २०२६ असा होता. सदर पुरस्कारांसाठी प्रवेशिका मागविण्याकरीता दि. ३१ मार्च, २०२६




पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. राज्यातील विविध भागातील स्पर्धकांनी संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून आणि मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील स्पर्धकांनी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२ येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत. तसेच अर्जाचे नमुने ... या संकेतस्थळावरही उपलब्ध आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# थेट कर्ज योजना; लाभार्थ्यांची २ एप्रिलला लॉटरी पद्धतीने निवड

जनसंचलन/बुलढाणा

साहीत्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, बुलढाणा जिल्हा कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या थेट कर्ज योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची निवड लॉटरी पद्धतीने करण्यात येणार आहे. लाभार्थी निवड दि. २ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, चिखली रोड, बुलढाणा येथे चिठ्ठीद्वारे (लॉटरी पद्धतीने) केली जाणार आहे. अपर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या लाभार्थी निवड समितीच्या बैठकीत एकूण १२६ अर्ज पात्र ठरविण्यात आले आहेत. यामध्ये ८६ पुरुष व ४० महिला लाभार्थ्यांचा समावेश आहे. यापैकी एकूण ९० लाभार्थ्यांची अंतिम निवड करण्यात येणार आहे. योजनेअंतर्गत प्रकल्प मर्यादा एक लाख रुपये निश्चित करण्यात आली आहे. पात्र अर्जदारांची यादी महामंडळाच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात आली असून संबंधितांनी याची नोंद घ्यावी. तसेच जिल्ह्यातील सर्व पात्र अर्जदारांनी संबंधित दिवशी उपस्थित राहावे, असे आवाहन महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक दिनेश श. पाखमोडे यांनी केले आहे.




# नांदुरा येथे राज्यस्तरीय शालेय तेंग सु-डो स्पर्धांचे आयोजन

जनसंचलन/बुलडाणा

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच तेंग सु-डो स्पोर्ट्स असोसिएशन, नांदुरा यांच्या सहकार्याने नांदुरा येथे राज्यस्तरीय शालेय तेंग सु-डो क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा दि. २४ व २५ मार्च २०२६ दरम्यान छत्रपती श्री शिवाजी महाराज सभागृह, नगर परिषद, नांदुरा येथे पार पडणार असून १४, १७ व १९ वर्षांखालील मुला-मुलींचा सहभाग राहणार आहे. या स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्यातील विविध विभागांतून प्रत्येकी ४८ मुले व ४८ मुली सहभागी होणार आहेत. तसेच प्रत्येक संघासोबत प्रशिक्षक, संघ व्यवस्थापक, पंचाधिकारी व स्वयंसेवकांचा सहभाग असणार असून सुमारे ५०० जणांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सहभाग अपेक्षित आहे. स्पर्धेचा उद्घाटन समारंभ २४ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता होणार असून यावेळी क्रीडा क्षेत्रातील मान्यवर, क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे अधिकारी, जिल्हा क्रीडा परिषदेचे पदाधिकारी, शिवछत्रपती पुरस्कार विजेते, अमरावती विभागाचे उपसंचालक तसेच विविध क्रीडा संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. स्पर्धेसाठी खेळाडूंच्या निवासाची व्यवस्था हरसिद्धी लॉन, खामगाव रोड येथे करण्यात आली असून भोजनाची व्यवस्था स्पर्धा स्थळी करण्यात आली आहे. तसेच सभागृहात तेंग सु-डो खेळासाठी दोन एरिना (कोर्ट) तयार करण्यात आले आहेत. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी विविध समित्या कार्यरत असून आयोजन समिती, तांत्रिक समिती, तक्रार निवारण समिती, वैद्यकीय, निवास, भोजन, प्रसिध्दी व स्वच्छता समित्या समन्वयाने काम करत आहेत. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी तसेच तेंग सु-डो स्पोर्ट्स असोसिएशन, नांदुरा यांचे पदाधिकारी प्रयत्नशील आहेत. जिल्ह्यातील क्रीडाप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्पर्धेचा आनंद घ्यावा, तसेच स्थानिक शाळांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा पाहण्यासाठी पाठवावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर यांनी केले आहे.

# धनुर्विद्येत सुंदरखेडच्या विदीशा डोंगरदिवेचा सुवर्ण वेध!

## महाराष्ट्र राज्य स्पर्धेत वैयक्तिक व सांघिक गटात पटकावले प्रथम स्थान; दोन सुवर्णपदकांसह गावाचे नाव केले उज्वल

जनसंचलन/बुलढाणा

तालुक्यातील सुंदरखेड येथील माऊली पार्क परिसरातील कु. विदीशा डोंगरदिवे हिने राज्यस्तरीय धनुर्विद्या स्पर्धेत देदीप्यमान कामगिरी बजावली आहे. विदीशाने या स्पर्धेत महाराष्ट्रात वैयक्तिक आणि सांघिक अशा दोन्ही क्रीडा प्रकारांत प्रथम क्रमांक पटकावून दोन सुवर्णपदके आपल्या नावावर केली आहेत. तिच्या या यशामुळे सुंदरखेडसह संपूर्ण जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. विदीशाने अत्यंत कठीण परिश्रमातून आणि जिद्दीच्या जोरावर धनुर्विद्या या खेळात प्राविण्य मिळवले आहे. राज्य स्तरावर एकाच वेळी दोन सुवर्णपदके जिंकून तिने आपल्या कौशल्याची चुणूक दाखवून दिली. ग्रामीण भागातील मुलीने क्रीडा क्षेत्रात गाजवलेल्या या पराक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. पालकांचा गौरव व विदीशाला रोख बक्षीस विदीशाच्या या ऐतिहासिक यशाची दखल घेऊन तिचा यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी विदीशाच्या आई-वडिलांचा शाल व श्रीफळ देऊन विशेष सत्कार करण्यात आला. तसेच, विदीशाच्या पुढील क्रीडा प्रवासाला प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने तिला रोख बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले.



मुलीच्या यशामध्ये पालकांचा मोठा वाटा असतो, त्यांच्या पाठबळामुळेच विदीशाने हे यश संपादन केले आहे, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या. विदीशा डोंगरदिवे हिच्या या यशाबद्दल सुंदरखेड परिसरात आनंदाचे वातावरण असून, तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आगामी काळात ती राष्ट्रीय स्तरावर देखील अशाच प्रकारे चमकून जिल्ह्याचे नाव रोशन करेल, असा विश्वास क्रीडाप्रेमींनी व्यक्त केला आहे.

# उष्ट्या पत्रावळ्या, द्रोण नालीत टाकल्याने वाद

जनसंचलन/मोताळा

पोटा (ता. नांदुरा) येथे जेवणाच्या उष्ट्या पत्रावळ्या व द्रोण नालीत टाकल्याच्या कारणावरुन एका कुटुंबातील सदस्यांना काठीने मारहाण केल्याची घटना २२ मार्च रोजी घडली. या प्रकरणी पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. देवकाबाई अशोक सरकटे (रा. पोटा) यांनी प्रकरणी तक्रार दिली. तक्रारीनुसार, त्यांच्या कुटुंबाचा गावातील साहेबराव तुकाराम नरवाडे यांच्याशी जागेचा वाद सुरू आहे. संबंधित जागेचा निकाल सरकाटे यांच्या बाजूने लागला असतानाही आरोपींकडून वारंवार वाद उकरून काढला जात होता. दरम्यान, २१ मार्च रोजी मुलगा शरद याचा वाढदिवस असल्याने घरी जेवणाचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. कार्यक्रमानंतर उरलेले अन्न घरासमोरील नालीत टाकण्यात आले होते. २२ मार्च रोजी सकाळी नीलेश साहेबराव नरवाडे व ज्योती निलेश नरवाडे हे घरासमोर येऊन शिवीगाळ करू लागले. नालीत अन्न का टाकले, या कारणावरून त्यांनी वाद घालत काठीने मारहाण केली. त्यानंतर प्रकरण चिघळले. यातील जखमीवर रुग्णालयात उपचार सुरू आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८